# <u>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित</u>
# (महावितरण)

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) आणि लॅन्को एनर्जी प्रा. लि. यांच्यातील वीजखरेदीच्या करार मंजुरीच्या २७ जून २००७ च्या आदेशाचे पुनर्विलोकन करावे यासाठी महावितरण यांनी केलेल्या विनंती अर्जावर सूचना/अभिप्राय मागविण्याकरिता-**

## <u>जाहीर सूचना</u>
## (प्र.क्र. ४०/२००७)

१. सिक्कीम राज्यातील तिस्ता येथे उभारण्यात यावयाच्या ५०० मे. वॅट जलविद्युत प्रकल्पातून विक्रीसाठी उपलब्ध होणारी वीज खरेदी करण्यासाठी महावितरण आणि मे. लॅन्को एनर्जी प्रा. लि. यांच्यातील दीर्घकालीन वीजखरेदी करारास मंजुरी मिळावी याकरिता महावितरण यांनी ३० ऑगस्ट २००६ रोजी विनंतीअर्ज सादर केला होता. प्र.क्र.२७/२००६ महावितरण आणि मे. लॅन्को एनर्जी यांच्यातील उक्त दीर्घकालीन तत्त्वावरील वीज खरेदी करारास आयोगाने २६ जून २००७ च्या आदेशान्वये मंजुरी दिली.

२. महावितरण यांनी उक्त प्रकरणी आयोगाने संमत केलेल्या आदेशाचे पुनर्विलोकन केले जावे म्हणून विंनतीअर्ज सादर केलेला आहे. आयोगाने उक्त प्रकरणी १२ फेब्रुवारी २००८ प्रकरण क्र. ४०/२००७ रोजीच्या आदेशान्वये महावितरण यांचा पुनर्विलोकनासाठीचा विनंती अर्ज दाखल करुन घेतला आहे; आणि त्या अर्जावर प्रस्तुत सूचनेद्वारे जनतेकडून अभिप्राय/सूचना मागवण्यात असे निदेश महावितरण यांना दिले आहेत.

३. पुनर्विलोकन विनंती अर्जाची निःश्लुक प्रत, लेखी विनंती केली असता महावितरण यांच्या मुख्य कार्यालयातून मिळू शकेल.

मुख्य कार्यालय : मुख्य अभियंता (वीज खरेदी)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पाचवा मजला, प्रकाशगड,
प्लॉट क्र.जी-९, वांद्रे (पूर्व),
मुंबई ४०० ०५१.
दुरध्वनी : ०२२- २६४४७ ६८४३
फॅक्स : ०२२-२६४७ ५०१२
इ-मेलः सीईपीपी अेट द रेट महाडीसकॉम.इन.

४. जनतेने आपल्या सूचना/अभिप्राय मा. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, तेरावा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४०० ००५ (फॅक्स ०२२-२२१६३९७६, ई-मेल :- mercindia@mercindia.org.in.) या पत्त्यावर (एक प्रत विनंती अर्जदार : महावितरण यांना पाठवल्याच्या पुराव्यासहित) १० मार्च २००८ पर्यंत मिळतील अशा बेताने पाठवाव्यात.

५. स्वारस्य असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने आपल्या सूचना /अभिप्राय यांच्या इंग्रजी अथवा मराठी भाषेतील चार प्रती पाठवाव्यात व त्यांवर आपले संपूर्ण नाव, डाक पत्ता व असल्यास, ई-मेल पत्ता नमूद करावा. अभिप्राय/सूचना एखादया ग्राहक प्रवर्गाच्या संघटनेमार्फत करण्यात येत असल्यास तसे नमूद करावे. आयोगाने आपले निवेदन ऐकून घ्यावे अशी सूचना कर्त्याची इच्छा असल्यास आयोगाकडून पुढील ठिकाणी घेण्यात येणाऱ्या सुनावणीत तशी संधी देण्यात येईल; त्याकरिता वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**सुनावणीचे ठिकाण, : आयोगाने कार्यालय,**
**तेरावा मजला, केंद्र क्र.१,**
**जागतिक व्यापार केंद्र,**
**कफ परेड, मुंबई ४०० ००५.**
**बुधवार, दिनांक १२ मार्च २००८.**
**रोजी सकाळी ११.०० वाजता.**

६. महावितरण यांच्याकडून, प्रत्येक आक्षेप/सूचना/अभिप्राय यांना ते मिळाल्यापासून तीन दिवसांत, परंतु **६ मार्च २००८** पर्यंत मिळालेल्या सर्व आक्षेप/सूचना/अभिप्राय यांना **११ मार्च २००८** पर्यंत उत्तरे देण्यात येतील.

७. पुनर्विलोकन विनंतीअर्जाचा दस्तऐवज महावितरण यांच्या वेबसाईटवर ( www.mahadiscom.in) नि:शुल्क उतरवून घेण्यासाठी उपलब्ध आहे.

स्वाक्षरी

**(आरिजीत घोष)**
संचालक, वित्त
महावितरण

मुंबई
दिनांक : १६.०२.२००८.